आ. प्र.
२२०५
२८/३/१८
मिलन म्हात्रे

जोडपत्र –"अ"

(नियम ३ पहा)

केंद्रशासनाचा माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये माहिती मिळण्याबाबतचा अर्जाचा नमुना.

ई-टेंडरींग कक्ष
आवक क्र.: २२५८
दिनांक: २८/०३/२०१८

प्रति,

मा.आयुक्त सो।,

मिरा भाईंदर महानगरपालिका तथा,

तथा राज्य माहिती अधिकारी.

१)अर्जदाराचे पूर्ण नाव –मिलन वसंत म्हात्रे.

२)अर्जदाराचा पूर्ण पत्ता -१०१ गोविंद नगर ,सी बिल्डींग ,ए विंग

भाईंदर पोलीस स्टेशन समोर ,भाईंदर (प) ता. जि. ठाणे पिन कोड ४०१ १०१

मो .नं. ९३२११७११६६

३) आवश्यक असलेल्या माहितीचा तपशील खालील प्रमाणे

(एक) माहितीचा विषय –

१) आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ अन्वये आपल्या मिरा भाईंदर महानगरपालिका परिसरामध्ये आपल्यातर्फे राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण स्थापन झाल्याबाबतची माहिती मिळणेबाबत .

२) आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ अन्वये मिरा भाईंदर महानगरपालिका परिसरामध्ये आपल्यातर्फे आपत्ती निवारणासाठी मागील वर्ष २००५ पासून ते आजपर्यंत किती व कोणते कार्यक्रम राबविले? त्या करिता शासनाकडून आपणास प्राप्त झालेले शासन निर्णय ,शासकीय पत्र ,अर्धशासकीय पत्र ,निमशासकीय पत्र,परिपत्रके त्याचप्रमाणे या कार्यक्रमांवर झालेला वार्षिक खर्च झालेली रक्कम ,खर्च वेळेवर न झाल्या कारणास्तव शासनास परत गेलेली रक्कम इत्यादीची माहिती मिळणेबाबत.

३) १३ व्या वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार वर्ष २००५ ते आतापर्यंत किती निधी कोणाकोणाला उपलब्ध करून दिला? आणि तो कसा खर्च केला? त्याचे संबंधित शासन निर्णय ,कागदपत्रे इत्यादीची माहिती मिळणेबाबत

(दोन) माहिती ज्याच्याशी संबधित असेल तो कालावधी –

१)वर्ष २००५ ते २०१८

(तीन) आवश्यक असलेल्या माहितीचे वर्णन वरीलप्रमाणे,

१)उपरोक्त क्रमांक १ (माहितीचा विषय) या स्तंभातील अनुक्रमे १,२ व ३ प्रमाणे.

२)अर्जदार उपरोक्त माहिती व्यक्तीशा: घेणार.

अर्जदार मागासवर्गीय किंवा दारिद्र्यरेषेखालील नाही.

देण्यात येणाऱ्या माहितीचे सर्व कागदपत्रांच्या साक्षांकित प्रती सही शिक्यानिशी द्याव्यात .त्याची होणारी शासकीय फी नियमानुसार भरावयास तयार आहे.

ठिकाण –भाईंदर (प)

दिनांक –२६/०३/२०१८

अर्जदाराची सही.

मिलन म्हात्रे

(श्री.मिलन वसंत म्हात्रे)

Scanned by CamScanner

# मिरा भाईंदर महानगरपालिका

माहितीचा अधिकार

आपत्ती व्यवस्थापन विभाग
जा.क्र. मनपा/आ.व्य./ ०८ /२०१८-१९
दि. ०८/०४/२०१८

प्रति,
मा. जन माहिती अधिकारी
लेखा विभाग

विषय : माहिती अधिकार अधिनियम अंतर्गत माहिती उपलब्ध करून देणेबाबत.

संदर्भ : श्री. मिलन वसंत म्हात्रे यांचा दि. २६/०३/२०१८ रोजीचा अर्ज.
(प्राप्त दि. २८/०३/२०१८)

महोदय,

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आपत्ती व्यवस्थापन विभागाकडे उपरोक्त संदर्भिय श्री. मिलन वसंत म्हात्रे यांचा माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत अर्ज प्राप्त झालेला आहे. सदर अर्जामध्ये नमुद केलेप्रमाणे मुद्दा क्र. (३) आपले विभागाशी निगडीत असल्याने अर्जदार यांना आवश्यक ती माहिती आपले विभागाकडून परस्पर उपलब्ध करून देणेस विनंती आहे. यापत्रासोबत माहिती अधिकारा अंतर्गत अर्जदाराने केलेल्या अर्जाची प्रत जोडून देत आहे.

(मनस्वी म्हात्रे)
जन माहिती अधिकारी
तथा सिस्टीम प्रोग्रामर
आपत्ती व्यवस्थापन विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रत माहितीस्तव -
श्री. मिलन वसंत म्हात्रे (अर्जदार)

Scanned by CamScanner

# मिरा भाईंदर महानगरपालिका

माहितीचा अधिकार

आपत्ती व्यवस्थापन विभाग
जा.क्र. मनपा/आ.व्य./ ०८ /२०१८-१९
दि. ०७/०५/२०१८

प्रति,
**श्री. मिलन वसंत म्हात्रे**
**१०१, गोविंद नगर, सी बिल्डींग, ए विंग,**
**भाईंदर पोलिस स्टेशन समोर, भाईंदर (प.)**

**विषय : माहिती अधिकार अधिनियम अंतर्गत माहिती उपलब्ध करून देणेबाबत.**

**संदर्भ : आपला दि. २६/०३/२०१८ रोजीचा अर्ज. (प्राप्त दि. २८/०३/२०१८)**

**महोदय,**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आपत्ती व्यवस्थापन विभागाकडे आपला उपरोक्त संदर्भिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत अर्ज प्राप्त झालेला आहे. सदर अर्जामध्ये नमुद केलेप्रमाणे मुद्दा क्र. (२) मध्ये नमुद केलेल्या आवश्यक माहितीबाबत तपशिल खालीलप्रमाणे :

| मुद्दा क्रमांक | आवश्यक माहितीचा तपशिल | कागदपत्रांची संख्या |
|---|---|---|
| २ | आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ अन्वये मिरा भाईंदर महानगरपालिका परीसरामध्ये आपल्यामार्फत आपत्ती निवारणासाठी मागील वर्ष २००५ पासून ते आजपर्यंत किती व कोणते कार्यक्रम राबविले? | १० |
| | त्याकरीता शासनाकडून आपणास प्राप्त झालेले शासन निर्णय, शासकीय पत्र, अर्धशासकीय पत्र, निमशासकीय पत्र, परिपत्रके | २ |
| | त्याचप्रमाणे या कार्यक्रमांवर झालेला वार्षिक खर्च झालेली रक्कम, खर्च वेळेवर न झाल्या कारणास्तव शासनास परत गेलेली रक्कम इत्यादीची माहिती मिळणेबाबत. | निरंक |

वरीलप्रमाणे कागदपत्रे या पत्रासोबत आपणांस उपलब्ध करून देण्यात येत आहेत. कृपया माहितीचा स्विकार व्हावा ही विनंती. प्राप्त माहितीने आपले समाधान न झाल्यास मा. उप-आयुक्त (मु.), तिसरा मजला, मिरा भाईंदर महानगरपालिका, मुख्य कार्यालय यांचे कडे ३० दिवसांचे आत प्रथम अपिल अर्ज दाखल करता येईल.

९/५/१८

**(मनस्वी म्हात्रे)**
**जन माहिती अधिकारी**
**तथा सिस्टीम प्रोग्रामर**
**आपत्ती व्यवस्थापन विभाग**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**संपर्क क्रमांक : ८४३३९११४४**
**ई-मेल : dm.mbmc@gmail.com**

Scanned by CamScanner